ISSN 2278-8808
An International Peer Reviewed
SCHOLARLY RESEARCH JOURNAL
FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# ई – लायब्ररी स्वयं अध्ययन

**डॉ.एन एम कडू**
सहसंचालक,उच्च शिक्षण मुख्यालय,
महाराष्ट् राज्य,पुणे

**श्रीमती. पुनम भिमराव वाघमारे**
असिस्टंट प्रोफे.
ॲड. विठ्ठलराव हांडे शिक्षणशास्त्र महाविदयालय,नासिक.

**Abstract**

अध्ययन अध्यायन प्रकिया वर्तमान काळामध्ये बदलत आहे. ई माध्यमांनी शिक्षण प्रणालिमध्ये अमुलाग्र परिवर्तन घडवून आणली आहेत. अध्ययन –अध्यापनात प्रभावी पाउले उचलत उच्च शिक्षणामध्ये विदयार्थी अध्यापनाकडे कमी केंद्रीत झालेला दिसून येत आहे. त्यांना ई माध्यमांव्दारे अध्ययनाची संधी उपलब्द झाली आहे. त्यामुळे ई अध्ययनाला महत्व प्राप्त होत आहे. इंटरनेटचा वापर प्रामुख्याने करतांना दिसून येतो. त्याचा विपरित परिणाम सामाजिक मुल्यावर झालेलाही दिसतो. रॉजर्सच्या मते कोणालाही ख–या अर्थाने शिकवू शकत नाही. शिकणा–याला केवळ सुविधा देवून अध्ययनाची वाट मोकळी करून स्वतंत्रपणे ज्ञान मिळविण्याची व त्यातुन व्यक्तिमत्वाची जडण–घडण करण्याची क्षमता वाढविणे. म्हणूनच ग्रंथालयाव्दारेच इंटरनेटची व्यवस्था सुरू केल्यास विदयार्थ्यांना नियंत्रित वातावरणात शिक्षण उपलब्द करून देता येईल. सामाजिक तसेच राष्ट्रीय विकासास हातभार लावता येईल.

**प्रास्ताविक.–**

एकविसावे शतक हे माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचे युग आहे. यामध्ये अध्ययन अध्यापन प्रकियेचे स्वरूप बदलत आहे. अध्ययनासाठी विविध माध्यमे उपलब्द आहेत. ही माध्यमे विदयार्थ्यांना स्वयं अध्ययनासाठी प्रेरित करतात. परंतू परिवर्तनीय सामाजिक परिस्थितीमध्ये स्वयं

*अध्ययनाच्या माध्यमांचा दुष्परिणाामही जाणवत आहे. विदयार्थी अध्यायानापेक्षा इतर अनावश्यक बाबींना प्राधान्य देत आहेत. त्यामुळे उच्च शिक्षणामध्ये समूह संपर्क साधनांच्या माध्यमातून शिक्षण दिल्यास राष्ट्ीय विकासास सहाय्य मिळेल*

*शिक्षण कसे असावे या संदर्भात डेलॉर्स आयोगाने समंतदपदह जीम जतमेंनतम ूपजीपद या अहवालात शिक्षणाचे चार आधारस्तंभ मांडलेले आहेत. ज्ञानप्राप्तीसाठी शिक्षण, कृतीसाठी शिक्षण,सहजीवनासाठी शिक्षण, अस्तित्वासाठी शिक्षण हे आधारस्तंभ होय. चारही परस्परांमध्ये गुंफलेले असून ऐकमेकांपासून स्वतंत्र करता येत नाही. ज्ञानार्जनाचे राष्ट्ीय ध्येय साध्य करतांना अध्यापनाबरोबर स्वयं अध्ययन प्रकिया आवश्यक ठरते. उच्च शिक्षणामध्ये विदयार्थ्याची बौध्दिक विचाराची दिशा ठरलेली असते. त्यांना मार्गदर्शनाची गरज असते. ज्ञानातून भूक ग्रंथालयाव्दारे भागविली जाते. परंतु जागतिकीकरणात परंतु परंपरागत ग्रंथालयाची भूमिका बदलणे काळाची गरज आहे. ग्रंथालयाबरोबर स्वयंअध्ययनात इतर माध्यमांचाही समावेश करतो. त्यामध्ये ई माध्यमाने अध्ययन साधने विशेष प्रभावित आहेत. त्यामुळे विचार ई अध्ययनाकडे कल वाढलेला आहे. म्हणूनच उच्च शिक्षण प्रकियेमध्ये ई अध्ययन माध्यमांची महाविदयालययात व्यवस्था असावी त्यासाठी प्रस्तूत लेखामध्ये भर देण्यात आलेला आहे.*

***ई अध्ययन –***

*ई अध्ययनामधील ई हे अक्षर इलेक्ट्ॉनिक या शब्दासाठी वापरले गेले आहे. ई अध्ययन म्हणजे इलेक्ट्ॉनिक साधनाव्दारे केलेले अध्ययन होय.ई साधनांमध्ये दुरचित्रवपाणी, इंटरनेट,संगणक,सीडी,व्हिडीओ इ.चा समावेश होतो.*

***अध्ययन** – अध्यापन प्रकियेत हेतूपुरस्करपणे माहिती तंत्रज्ञान संप्रेषणाचा वापर करणे म्हणजे ई अध्ययन होय. ई अध्ययन विदयार्थ्यांना स्वयंप्रेरित,स्वयंमार्गदर्षक ,स्वविचारांना प्रेरणा देणारी प्रभावी प्रकिया आहे. स्वयं अध्ययनास पोषक वातावरण निर्मिती करते. हा वापर करतांना तो विशिष्ट वेळी तसेच कोणत्याही वेळी करता येतो. क्षणार्धात विदयार्थ्यांना अत्यावश्यक ज्ञान प्राप्त होते.*

## ई अध्ययनाची

वैशिष्ट्ये


- गतिशिलता
- ज्ञान प्राप्ती मर्यादा नाही
- अध्ययनाचे विविध स्त्रोत
- स्वयंनियंत्रित प्रकिया
- आशयाची विविध स्वरूपात मांडणी
- स्वयं गतीने अध्ययन
- सखोलतेने अध्ययन
- जागतिक स्तरावर शिक्षक व विदयार्थी आंतरकिया
- सहकार्ययुक्त अध्ययन

**डॉ.** एडगर कॅार यांच्या अध्यक्षेतेखाली आंतरराष्ट्रीय आयोगाने अस्तित्वासाठी शिक्षण हा अहवाल मे 1972 मध्ये युनेस्कोला सादर केला या अहवालात त्यांनी स्वयं अध्ययनावर विशेष भर दिला. यासाठी वर्तमानकाळात ई माध्यमे प्रभावी भूमिका बजावत आहे. भौगोलिक मर्यादा पार केलेले आहे. विदयार्थ्यांना ग्रंथालयाबरोबरच इंटरनेटवरील माहती महत्वपूर्ण आहे. उच्च स्तरावर शिक्षण घेणारे विदयार्थी इंटरनेटवरील वेबसाईटस्,चॅटिंग ई मेल,एज्यसॅट इ. चा उपयोग करतात. इंटरनेटचा प्रभाव वाढल्यामुळे सायबर कॅफेजवळ नियमित विदयार्थ्याची गर्दी दिसून येते. याचा वापर वर्तमान पिढीमध्ये योग्य दिशेने होतांना दिसून येत नाही. त्यामुळे महाविदयालयीन स्तरावर जर संगनकावर इंटरनेट,सीडी,यांची व्यवस्था ग्रंथालयामध्ये नियंत्रित वातावरणात दिल्यास विदयार्थ्यांना योग्य मार्गदर्शन मिळेल. ई लायब्ररी ही संकल्पना प्रत्यक्षात आणता येईल. नियंत्रित वातावरणामुळे विदयार्थ्यांना सायबर कॅफेला जाणे,वेबसाईट षोधणे,इ. साठी लागणारा वेळ वाचणार आहे. कमी वेळामध्ये जास्त अध्ययन घडून येणार आहे. सामाजिक मुल्यांचा होणारा –हास नियंत्रणात आणता येणार आहे. स्वयंअध्ययनाची गरज विशद करतांना रॅाजर्स यांनी

तिममकवउ जव समंतद या ग्रंथात असे म्हटले आहे की. आपण कोणालाही ख–या अर्थाने शिकवू शकत नाही. शिकणा–याला केवळ सुविधा देवून अध्ययनाची वाट मोकळी करून स्वतंत्रपणे ज्ञान मिळविण्याची व त्यातून व्यक्तिमत्वाची जडण–घडण करण्याची क्षमता वाढविणे त्यासाठी ई लायब्ररीची भूमिका महत्वपूर्ण ठरणार आहे.

**ई लायब्ररीची भूमिका –**

पारंपारिक अध्ययन प्रणाली आणि ई अध्ययनाची तुलना केली असता ई लायब्ररीची जोड अध्ययनासाठी परिणामकारक ठरणार आहे. चार भिंती ओलांडून ज्ञान प्राप्ती घडून येते. अदययावत ज्ञान संग्रहासाठी ग्रंथालयामध्ये ई माध्यमांच्या सुविधा उपलब्द करून देणे. ग्रंथालयामध्ये ग्रंथपालाची ,मार्गदर्शकाची जबाबदारी वाढणार आहे. त्यासाठी लागणारी आवश्यक साधनांची जुळवा जूळव करावी लागणार आहे.




1. **तज्ञ मार्गदर्शक व समुपदेशक –**

ग्रंथालयामध्ये संगणकाबदद्लचे ज्ञान असणारा मार्गदर्शकाची नेमणूक करावी. विदयार्थ्यांना आवश्यक सीडी, वेबसाईटस् यांची माहीती विषयानुरूप देवू शकेल.

2. **संगणक हाताळण्याची क्षमता –**

ई लायब्ररीमध्ये नेमणूक केलेल्या मार्गदर्शक संगणक हाताळण्यात निष्णात असावा. इंटरनेटव्दारे स्वयं अध्ययनास प्रेरित करणारा असावा. विदयार्थ्यांचे अध्ययन योग्य दिशेने मार्गक्रमण करण्यासाठी तात्काळ सेवा उपलब्द करून देणारा असावा. संगणाकाचा पुरेपूर वापर करून घेण्याची क्षमता असावी.

3. **इंटरनेट वापरण्याची क्षमता –**

इंटरनेटच्या माध्यमातून अध्ययनाचे विविध स्त्रोत शोधणे,ई मेल,ब्लॉग्ज,डाउनलोडींग,कॉन्फरन्सिंग इ. कार्य करता यावीत विदयार्थ्यांना विस्तृत माहितीतून आवश्यक माहिती शोधून देण्यास सहायय करणे आवश्यक आहे. ग्रंथालयामध्ये ई–सिडीस् ठेवाव्यात म्हणजे विदयार्थी त्यांचा अध्ययनासाठी लाभ करून घेतील.

4. **वेबसाईटचे ज्ञान –**

उच्च शिक्षण स्तरावर विविध शाखा उपलब्द आहेत. त्यामुळे विषयानुरूप ज्ञान प्राप्तीची आवश्यकता असते. इंटरनेटवर अनेक वेबसाईटस् विषयानुरूप,घटकानुरूप उपलब्द आहेत. टेक्सबुक,संदर्भ साहित्य,ई–जर्नलस् ई बुक्स,सीडीस् इ. माहिती विदयार्थ्यांना सांगणे आवश्यक आहे. ज्यामुळे विदयार्थी विनाकारण अनावश्यक आशयाचा शोध न घेता उपयुक्त आशयाकडे लक्ष केंद्रित करतील त्यामुळे त्याचा वेळ वाचणार आहे.

5. **वर्गानुसार नियोजन –**

विविध शाखा असल्यामुळे सर्व शाखांनुसार वेळैच नियोजन करणे आवश्यक ठरणार आहे. प्रत्येक वर्गाला वेळ ठरवून दयावा. विदयार्थ्यांना आवश्यक वेबसाईटस् सांगितल्यास कामे लवकर होतील. हया काळात मार्गदर्शकाचे पुर्ण लक्ष विदयार्थ्याकडे त्यांच्या कृतीकडे असणार आहे. वेळेचे बंधन असल्यामुळे विदयार्थी कामे लवकर करतील.

6. **संगणक देखभाल –**

संगणक देखभाल करता यावी संगणकासाठी आवश्यक असणारा कक्ष, कक्षाची स्वच्छता साहित्य याची वेळोवेळी काळजी घेणे गरजेचे आहे.

7. **प्रभावी अंमलबजावणी –**

शाखानुरूप संगणक प्रात्याक्षिकाचे नियोजन असणार आहे. विदयार्थ्यांना प्रात्याक्षिक करण्यसाठी संधी मिळणे आवश्यक आहे. नियोजनाप्रमाणे अंमलबजावनी व्हावी यासाठी विषयानुरूप संगणक प्रात्याक्षिक दयावी. म्हणजे एकावेळी एकाच कार्यावर विदयार्थी केंद्रीत होतील. एका नंतर दुस–या विषयाचे प्रात्याक्षिक कार्य करण्यात वेळ उपलब्द होईल विदयार्थ्यांचा एकमेकांचे प्रात्याक्षिक बघून लिहीण्याकडे असणारा कल कमी होईल त्याचा परिणाम म्हणजे ग्रंथालय योग्य प्रकारे प्रात्याक्षिकांची अंमलबजावणी करू शकतील.

8. **नियंत्रण करणे–**

ग्रंथालयाव्दारे राबविल्या जाणा–या या उपकमामध्ये विदयार्थी प्रात्याक्षिक कार्य करतांना नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. नियंत्रित वातावरण असल्यामूळे ध्येय प्राप्तीकडे विशेष लक्ष देतील. अध्ययनासाठी स्वयं प्रेरणा मिळणार आहे. त्यामुळे राष्ट्रीय विकास मुल्याला सहाय्य मिळणार आहे.

**समारोप.–**

उच्च शिक्षणातून विदयार्थ्यांना स्वयं अध्ययनास प्रेरणा मिळावी यासाठी ई लायब्ररी महत्वपूर्ण भूमिका बजावू शकेल. त्यासाठी प्रभावी अंमलबजावणी केल्यास ई लायब्ररी ग्रंथालयाची चेहरा मोहरा प्रकिया ठरणार आहे. जागतिकीकरणतील विचार करता विदयार्थ्यांना अदययावत ज्ञान देण्याची जबाबदारी उच्च षिक्षणाने प्रभावीपणे पार पाडावी उच्च शिक्षणाला आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या प्रक्रियेत स्थान टिकविण्यासाठी ई लायब्ररी महत्वपूर्ण भूमिका बजावेल यात शंका नाही. त्यामुळे राष्ट्रीय विकासही साधला जाणार आहे.

**संदर्भ साहीत्य**

1. गायकवाड,माधव, ; 2001 द्ध इंटरनेटची हात ओळख, क्षितिज प्रकाशन, नाशिक.
2. बरवे मिनाक्षी, ;1990द्ध संगणक : शिक्षण व शिक्षक,नुतन प्रकाशन पुणे,
3. श्री विकास, ;2003द्ध विकास कार्यानुभव माहिती तंत्रज्ञान पुस्तिका इ.10 वी
4. चव्हाण किशोर ;2008द्ध माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान,ईनसाईट पब्लिकेशन नाशिक
5. वर्तमानपत्रे,मासिके,नियतकालिके आणि वेबसाईट इ.